## गुन्ह्यातील रक्कम हस्तगत; चौघांना पोलिस कोठडी

**नवीन नांदेड/ प्रतिनिधी**

लातूर फाटा, सिडको भागात एक महिन्यापूर्वी एका शेतकऱ्याला भरदिवसा लुटण्यात आले होते. या प्रकरणाचा पोलिसांनी छडा लावला असून आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करुन ही रक्कम तक्रारदाराला सूपूर्दही करण्यात आली आहे.



कंधार तालुक्यातील लाठखुर्द येथील शेतकरी कोडींबा इंगोले हे सिडको येथील अवधूत पवार यांच्या मुलीच्या विवाहासाठी दि.१३ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता लातूर फाटा येथे आले. तेव्हा त्यांच्या जवळ ऑटो आला. त्यात तीन अनोळखी व्यक्ती होत्या. त्यांनी अवधूत पवार यांच्या मुलीचे लग्न कोणत्या मंगल कार्यालयात आहे, अशी विचारणा इंगोले यांना केली. तेव्हा ऑटोतील आरोपींनी बसा, वासवी मंगल कार्यालयाकडे आपणही जाऊ असे सांगितले आणि त्यांना ऑटोत बसवले. परंतु ऑटो मंगल कार्यालयात न नेता भेटवस्तू खरेदी करावयाची आहे, ढवळे कॉर्नरवर जाऊ असे सांगितले. ऑटो ढवळे कॉर्नरमार्गे सिडकोत नेला आणि संभाजी चौकात त्यांना उतरवून सर्व जण पळून गेले.नंतर इंगोले यांना शंका आल्याने त्यांनी वॉचपाकिट तपासले असता खिसा फाटलेला आढळला. ऑटोचालक व त्यातील आरोपींनी ५० हजार रुपये चोरल्याची तक्रार इंगोले यांनी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात दिली. त्यावरुन गुरनं. १७२ / २०२३ कलम ३७९,३४ भा. दं. वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन सपोउपनिरीक्षक शिंदें यांच्याकडे तपास देण्यात **(पान २ वर..)**